
# ५. अजिंठ्याची सहल

**पं. महादेवशास्त्री जोशी** (१९०६-१९९२) : कथालेखक, संस्कृतिकोशाचे संपादक. वेदान्त, व्याकरण, ज्योतिष, काव्यशास्त्र याचे अध्ययन. 'खडकांतील पाझर', 'विराणी', 'कथाकांता', 'घररिघी', 'कथासुगंध', 'कल्पवृक्ष' हे कथासंग्रह प्रसिद्ध.

प्रस्तुत पाठात अजिंठ्याच्या सहलीचे वर्णन केले आहे. भारतातील आश्चर्यांपैकी एक आश्चर्य म्हणजे ही अजिंठ्याची लेणी होय.



मुलांनो, चला, उतरा. आलं अजिंठा. आता आणखी चढून गेलं, की तुम्हांला अजिंठ्याची लेणी पाहायला मिळतील. पाहिलीत ही गर्दी! परदेशांतील काही मंडळीही लेणी पाहायला आली आहेत. लांबलांबचे लोक इथे येतात. चला, आता आपण लेण्यांकडेच जाऊ.

आता समोरच्या डोंगरदरीकडे पाहा. कशी अर्धचंद्रासारखी दिसते, नाही? या डोंगरदरीच्या पोटात तीस गुंफा आहेत. हीच अजिंठ्याची लेणी. ती पाहा, काही लेणी दिसायला लागली. थांबा. आधी थोडीशी माहिती घ्या, म्हणजे आपण काय पाहतो ते नेमकं तुम्हांला कळेल.

आत शिरलात, की काही गुंफांत तुम्हांला प्रशस्त लांबरुंद दालनं दिसतील. चार-पाच मीटर त्याची उंची. वर सपाट छत. दोन्ही बाजूंना भव्य स्तंभ कोरलेले अन् नक्षीदार प्रवेशद्‌वारावर अर्धवर्तुळाकृती गवाक्षे. गवाक्षे म्हणजे हवा व उजेड आत येण्यासाठी खिडक्या. चला, माझ्यामागून ओळीने या.

आत शिरताच गारेगार वाटलं ना? उन्हातान्हातून प्रवास केल्याचा शिणवटा निघून गेला की नाही? लेण्यांतली हवा अशीच नेहमी गारेगार असते.

आता समोर लक्ष द्या. केवढा प्रशस्त चौथरा आहे हा! आणि त्यावर कोण बसलं आहे सांगा बरं! 'भगवान गौतम बुद्‌ध'. बुद्‌ध ओळखण्याची खूण म्हणजे पद्‌मासन घालून बसलेले, डोळे अर्धवट मिटलेल्या कमळासारखे आणि नजर नाकाच्या शेंड्यावर खिळलेली. मुखावर करुणेचा भाव. कानाच्या पाळ्या लोंबलेल्या. जवळजवळ खांद्याला भिडलेल्या. मस्तकावर कुरळ्या केसांच्या जटा. एवढं लक्षात ठेवलंत, की तुम्हांला कोठेही गौतम बुद्‌ध ओळखता येतील.

इथल्या सगळ्या लेण्यांना नावं नाहीत; पण एकोणिसाव्या लेण्याला नाव आहे, त्याला म्हणतात गंधकुटी. हे लेणे तुम्ही सावकाशीनं पाहा. बराच वेळ लागेल, कारण ते आत, बाहेर व सगळीकडे कोरीव कामानं नटलं आहे. त्याच्यासमोर द्‌वारमंडप आहे. खांब सगळे वाटोळे. ते पाहा दुसरे बुद्‌ध. खाली नव्हे, वर दोन खांबांच्या कमानीत! इथे ते उभे आहेत अन् त्यांनी एक पायघोळ अंगरखा घातला आहे. त्याच्या चुण्या कशा अगदी स्पष्ट दिसतात. मुद्रासुद्‌धा किती शांत, किती गंभीर!

या गंधकुटी लेण्यात अन् सोळा व सतरा या क्रमांकांच्या लेण्यांत चित्रांची भरभार आहे. जिकडे पाहाल तिकडे चित्रंच चित्रं. साधी एकरंगी नव्हेत, तर बहुरंगी! रंग तरी कसे, तर सौम्य अन् टिकाऊ! यांतली बहुतेक चित्रं बुद्‌ध आणि त्याचा धर्म या विषयांचीच आहेत कारण बौद्‌ध धर्माच्या लोकांनीच ही

लेणी खोदली आहेत. गौतम बुद्धांच्या काही मजेदार कथा आहेत. त्यांना जातककथा असं म्हणतात. बुद्धांनी पूर्वी कोणत्या जातींत अन् प्राण्यांच्या रूपात जन्म घेतले, त्यांच्या त्या कथा आहेत. त्यांपैकी कित्येक कथा या लेण्यांत चित्रित केल्या आहेत.

सोळाव्या लेण्यातली सगळी चित्रं बुद्धांच्या शेवटच्या जन्मातली आहेत. मुलांनो, तुम्ही ती ओळीनं पाहात चला. हे मायावतीला म्हणजे बुद्धांच्या आईला पडलेलं स्वप्न! बुद्ध जन्माला आल्याचा तो पुढचा देखावा, अन् ही पुढल्या चित्रातली गंमत बघितलीत? पाच वर्षांचे गौतम बुद्ध धूळपाटीवर बोटानं अक्षरं गिरवीत आहेत. पूर्वी पाट्या नव्हत्या अन् दगडी पेन्सिलीही नव्हत्या. अशा धूळपाटीवर बोटं झरेतो अक्षरं गिरवावी लागत. असं शेवटपर्यंत पाहात गेलात, तर सगळं बुद्धांचं चरित्रच इथं चित्रांकित झालेलं दिसेल.

ही तीस लेणी किती जुनी, किती प्राचीन आहेत सांगू! सुमारे दोन हजार वर्षांची! आपण ही सगळी लेणी तीन-चार तासांत पाहून मोकळे होतो; पण ती सगळी कोरायला किती वर्षे लागली, ठाऊक आहे? सुमारे आठशे! ऐकून आश्चर्य वाटले ना? अशी अनेक अद्भुत आश्चर्ये आपल्या भारतात आहेत. तुम्ही मोठेपणी ती पाहा अन् धन्य व्हा!

◆◆◆

## स्वाध्याय

**प्र. १. (अ) चौकटी पूर्ण करा.**

(१) डोंगरदरीचा आकार –
(२) एकोणिसाव्या लेणीचे नाव –
(३) भारतातील एक अद्भुत आश्चर्य –
(४) गौतम बुद्धाची आई –

**(आ) आकृती पूर्ण करा.**

(१) **गंधकुटीतील गौतम बुद्धाची वैशिष्ट्ये.**

(२) **गंधकुटीतील चित्रांची वैशिष्ट्ये.**

**(इ) संज्ञा स्पष्ट करा.**

गवाक्ष जातककथा

**प्र. २. (अ) समर्पक उदाहरणे लिहा.**

(१) गौतम बुद्धांचा पाठात आलेला बालपणीचा प्रसंग –
(२) लेण्यांत शिरल्यानंतरचा अनुभव –

**(आ) पाठातील जोडशब्द शोधा.**

गारेगार, द्वारमंडप..................

(इ) खालील शब्दांचे विरुद्धार्थी शब्द लिहा.

(१) चढणे x

(२) बसणे x

(३) स्पष्ट x

(ई) खालील वाक्यांतील विरामचिन्हे ओळखा व त्यांची नावे लिहा.

(१) आत शिरल्यावर गारेगार वाटलं ना ?

(२) आपण ही सगळी लेणी तीन-चार तासांत पाहून मोकळे होतो; पण ती सगळी कोरायला किती वर्षे लागली, ठाऊक आहे?

(३) मुद्रासुद्धा किती शांत, किती गंभीर !

प्र. ३. स्वमत.

(१) तुमच्या मते अजिंठा लेणी आश्चर्यकारक असण्याची कारणे लिहा.

प्र. ४. 'लेण्यांतील हवा नेहमी गारेगार असते', यामागील वैज्ञानिक कारणाबाबत मित्रांशी चर्चा करा.

## भाषाभ्यास

### समास

✻ खालील वाक्ये वाचा व अभ्यासा.

| 'अ' गट | 'ब' गट |
|---|---|
| (१) सूर्याचा उदय झाला. | सूर्योदय झाला. |
| (२) प्रत्येक दिवशी त्याची प्रतिष्ठा वाढत गेली. | दिवसेंदिवस त्याची प्रतिष्ठा वाढत गेली. |

✻ खालील प्रश्नांची उत्तरे द्या.

(१) दोन्ही गटांतील वाक्यांचा अर्थ एकच आहे का?

(२) दोन गटांतील शब्द सारखे आहेत का?

(३) अधोरेखित शब्दांमध्ये 'अ' गट आणि 'ब' गटातील शब्दांमध्ये कोणता फरक आहे?

बोलण्याच्या ओघात आपण शब्दातील परस्परसंबंध दाखवणारे विभक्ती प्रत्यय गाळून सुटसुटीत असे जोडशब्द बनवतो. शब्दांच्या अशा एकत्रीकरणाला **'समास'** असे म्हणतात. शब्दांच्या अशा एकत्रीकरणाने जो जोडशब्द तयार होतो त्याला **'सामासिक शब्द'** म्हणतात.

**समास विग्रह –**

सामासिक शब्द कोणत्या शब्दांपासून तयार झाला, हे स्पष्ट करण्यासाठी आपण त्याची फोड करतो. या फोड करून दाखवण्याच्या पद्धतीला 'विग्रह' म्हणतात. वर 'ब' गटात सामासिक शब्द आहेत, तर 'अ' गटात विग्रह आहेत.

GBTP1H